॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२४ ( ) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या तेराव्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आविष्कार-२०१८ संशोधन स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पाच पारितोषिके प्राप्त करीत तिसरे स्थान पटकावले.

गोंडवाना विद्यापीठात नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.व्ही.एम.भाले, कुलगुरु डॉ.नामदेव कल्याणकर, कुलसचिव डॉ.ईश्वर माहुर्ले, डॉ.अतुल अत्रे, डॉ.प्रिया गेडाम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने या वर्षी देखील स्पर्धेतील आपला दबदबा कायम राखला. विविध गटात तीन प्रथम व दोन द्वितीय पारितोषिके कबचौ उमविने पटकाविली. याशिवाय मानव्यविद्या, भाषा, कला व समाजशास्त्र विद्याशाखेतील फिरता चषक कबचौ उमवि व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना विभागून देण्यात आला. पारितोषिक विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे-

मानव्यविद्या, भाषा, कला व समाजशास्त्र गट - पदवी गटात मनिषा चौधरी - प्रथम,
पीएच.डी.गट- श्रीमती स्वाती तायडे- द्वितीय,
वाणिज्य, व्यवस्थापनशास्त्र व विधी शाखा गट - पदव्युत्तर पदवी गटात विभा पाटील -प्रथम,
विज्ञान शाखा - पदव्युत्तर गटात मो.शाहरुख शाह हमीद शाह -द्वितीय,
अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गट - पदव्युत्तर गटात शुभम पाटील-प्रथम संघासोबत व्यवस्थापक म्हणून डॉ.दीपक दलाल, डॉ.अजय पाटील, प्रा.मनिषा इंदाणी, प्रा.निता पाटील सहभागी होते.

राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेत सहभागी झालेल्या कबचौ उमविच्या संघातील विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा जिल्हानिहाय आणि त्यानंतर विद्यापीठ स्तरावर घेण्यात येते. अधिक विद्यार्थ्यांना वाव दिला जावा असा त्या मागे हेतु आहे. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी अविष्कारद्वारे संशोधकांना प्रोत्साहित करण्यावर विशेष भर दिला आहे. आज या सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व संघ व्यवस्थापक यांचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, अविष्कार संशोधन स्पर्धेचे समन्वयक प्रा. भूषण चौधरी, डॉ. दीपक दलाल यांनी अभिनंदन केले.

---

जा.क्र.कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांकः- २४ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी